*नोटीस*
*निवडणुक*

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**
**नांवाशमनपा/निवडणूक/** 1726 /2026
**दि.** 08/10/2026

**प्रति,**
**श्री / श्रीमती** लंगडे जयश्री संजय
**पत्ता** - एन डी 41 - B3 4/12 चा भाग साईनगर सिडको,
नांदेड.
**मो.** - 9922844154

**विषय :-** **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक** 2025-2026 **मधील निवडणूक खर्चाचा हिशोब विहित नमुन्यात सादर न केल्याबाबत.**

**संदर्भ :-**
1. **राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्र. रानिआ-** 2023/**उनिख/प्र.क्र.**13/**संगणकीकरण कक्ष (ब), दिनांक** 15/02/2024.
2. **नोडल अधिकारी, निवडणूक खर्च व पर्यवेक्षण कक्ष यांचे पत्र.**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-2026 मध्ये आपण प्रभाग क्रमांक 20 – **ड** मधून उमेदवार म्हणून निवडणूक लढविली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भीय आदेशातील तरतुदींनुसार, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून 30 दिवसांच्या आत आपला एकूण निवडणूक खर्चाचा हिशोब तीन नमुन्यांमध्ये खर्च शपथपत्रासह सादर करणे बंधनकारक आहे: (1. **नमुना क्रमांक** 01 - उमेदवाराला प्राप्त निधी / देणगी बाबतचा तपशील स्वनिधी, पक्ष निधी, भेट, कर्ज इ. , 2. **नमुना क्रमांक** 02 - उमेदवाराने केलेल्या खर्चाचा तपशील, 3. **नमुना क्रमांक** 03 - उमेदवाराचे शपथपत्र)

तथापि, संदर्भ क्र.02 मधील निवडणूक खर्च व पर्यवेक्षण कक्षाच्या पत्राद्वारे असे निदर्शनास आले आहे की, आपण आपला निवडणूक खर्चाच्या हिशोबात पुढील प्रमाणे विहित नमुने सादर केलेले नाहीत.

| **नमुना क्रमांक** 01 | **नमुना क्रमांक** 02 | **नमुना क्रमांक** 03 |
|---|---|---|
| अप्राप्त | प्राप्त | अप्राप्त |

तरी, या नोटिशीद्वारे आपणास सूचित करण्यात येते की, सदर नोटीस मिळाल्यापासून **पुढील** 15 **दिवसांच्या आत** आपण विलंबाच्या खुलाशासह वरील विहित नमुन्यांमधील खर्चाचा हिशोब कक्ष 309, निवडणूक खर्च व पर्यवेक्षण कक्ष, मनपा मुख्य प्रशासकीय इमारत येथे सादर करावा. हा खर्च सादर करताना **सर्व खर्चाच्या मूळ प्रमाणकांसह (Bills/Vouchers) व बँकेतील स्टेटमेंटशी ताळमेळ घालून** परिपूर्ण स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.

जर आपण विहित 15 दिवसांच्या मुदतीत खर्चाचा हिशोब व आवश्यक कागदपत्रे सादर केली नाहीत किंवा त्रुटींची पूर्तता केली नाही, तर मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 चे कलम 16 (1ई), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 10 (1ई) अन्वये आपणास अनर्ह ठरविण्याबाबतचा प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त छ. संभाजीनगर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल, याची गंभीर नोंद घ्यावी.

सही/-
सहा. **निवडणुक निर्णय अधिकारी**
**निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय क्र.** 7

प्रत :
1. सिस्टीम मॅनेजर यांना देऊन कळविण्यात येते सदर नोटीस मनपाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात यावी.
2. निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय नोटीस बोर्ड.

8/10/2026